# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/04/2023 (बुधवार) दुपार

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. उमरेड :–** दिनांक १७/०४/२०२३ चे सकाळी ०५/०० वा. ते ०६/०० वा. सुमारास पो.स्टे. उमरेड हद्यीत फिर्यादी यांचा मुलगा वय १६ वर्ष हा दिनांक १७/०४/२०२३ चे सकाळी ०६/०० वा. सुमारास फिर्यादी झोपुन उठले असता फिर्यादीला मुलगा हा त्याच्या अंथरुणावर दिसुन आला नाही त्यावेळी फिर्यादी तो आजुबाजुला कुठे गेला असेल म्हणुन थोळा वेळ वाट पाहली परंतु मुलगा कुठेच दिसुन न आल्याने त्याचा ईतरत्र शोध घेतला परंतु कुठेच मिळुन आला नाही तसेच त्याचे कॉलेज मित्राकडे जावुन पाहीले तिथे ही मिळुन आला नाही नंतर घरी त्याचा वस्तुचा शोध घेतला असता त्याची कॉलेज बॅग व मोबाईल चार्जर व रियलमी कंपनीचा मोबाईल ज्यामध्ये जियो कंपनीचा सीम सोबत नेल्याचे दिसुन आले फिर्यादीचा मुलगा याचा अज्ञानतेचा फायदा घेवुन कोणीतरी अज्ञात ईसमाने त्यास फुस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि/शितल खोब्रागडे पोस्टे उमरेड मो. नं ८३०८०८२०९४ या करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. मौदा :–** अंतर्गत ०४ किमी अंतरावर रहाडी येथे दिनांक १३/०३/२०२३ चे १३.२१ वा. ते १७.३४ वा. दरम्यान घटना ता. वेळी व ठिकाणी टेलीग्राम मोबाईल क्रमांक च्या धारकाने फिर्यादीस घरबसल्या काम मिळेल या कारणावरून फिर्यादी हिच्या कडुन ऑनलाईन च्या माध्यमातुन एकुण २३६८०/– रू घेवून फिर्यादी हिची फसवणुक केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादवि. सह कलम ६६ (ड) मा.तं. सुधारणा अधि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी सोनेकर पोस्टे मौदा मो. नं. ८९७५९२१७७० हे करीत आहे.

## शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीविरूद्ध कार्यवाही

पो.स्टे. कुही :– अंतर्गत १६ किमी अंतरावर कुही वार्ड क्र. १६ येथे दिनांक १८/०४/२०२३ चे ०१.३० वा. ते ०२.३० वा. दरम्यान वार्ड क्र. १६ येथे झगडा भांडण सुरु आहे याबाबत माहिती मिळाल्यावरुन फिर्यादी हे पो.स्टे. कुही येथील पोलीस स्टॉफसह घटनास्थळी रवाना झाले. नमुद घटनास्थळी **आरोपी नामे– १) राकेश सुरेश सातपुते वय ३२ वर्ष २) स्नेहल सुरेश सातपुते वय २८ वर्ष ३) रोशन सुरेश सातपुते वय ३३ वर्ष, रा. सर्व प्लॉट नं. १६, नारी वस्ती नागपूर** हे हातात लाठी घेवुन गणेश आरिकरला मारायचे आहे, त्याचा विषय संपवायचा आहे. असे म्हणुन गेटवर चढण्याचा प्रयत्न करत असतांना नमुद तिन्ही इसम व इतरांनी पोलीसांनी बाहेर येवून पो.स्टे. ला. तक्रार देण्याबाबत समजावून सांगीतले असतांनी ही नमुद तिन्ही इसमांनी फिर्यादी व त्याचे सोबत असलेले पोलीस स्टॉफ नापोशि हरिदास ब. नं. २०७१ यांना हातबुक्याने मारहाण केली व त्यात पोलीस अंमलदार भागवत गुट्टे ब. नं. १२५५ यांचे डाव्या पायाच्या अंगठयाला जखम होण्यास कारणीभुत होण्यास व शासकीय कामात अळथळा निर्माण केला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– पोउपनि. देविदास ठमके वय ३४ वर्ष रा. पो.स्टे. कुही नागपूर ग्रामीण यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीं विरुध्द कलम ३५३, ३३२, ३४ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि सुचिता मंडवाले पोस्टे कुही, मो. नं. ९७६३२३४५४८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर